## ९. पर्यटन, वाहतूक व संदेशवहन

**प्रश्न-१ चूक की बरोबर ते सकारण सांगा.**

१) भारतातील नैसर्गिक विविधतेमुळे पर्यटन व्यवसायाचे भवितव्य उज्ज्वल आहे.

२) पर्यटन हा अदृश्य स्वरूपाचा व्यवसाय आहे.

३) देशातील वाहतूक मार्गांचा विकास हा देशांच्या विकासाचा एक निर्देशांक आहे.

४) भारतात पर्यटन व्यवसायाचा विकास नव्याने सुरु झाला आहे.

५) ब्राझीलिया ही ब्राझीलची राजधानी आहे.

६) ब्राझीलमध्ये सर्वत्र सामान्यपणे वाहतूक होते.

७) ब्राझीलमध्ये वाहतूक मार्गांचा जास्त विकास झालेला नाही.

८) ब्राझीलमधील पॅराना ही दक्षिणवाहिनी नदी जलवाहतुकीसाठी उपयुक्त आहे.

९) भारतात ब्राझीलच्या तुलनेने लोहमार्ग व रस्ते वाहतुकीचे जाळे दाट आहे.

१०) भारतात लोहमार्ग विकासामुळे प्रवासी व मालवाहतूक सुलभ झाली आहे.

११) भारतात उत्तर भारतीय मैदानी प्रदेशात लोहमार्गाचे विरळ जाळे आहे.

१२) जलमार्ग हे वाहतुकीचे स्वस्त साधन आहे.

१३) आंतरराष्ट्रीय व्यापारांपैकी सुमारे ९० % व्यापार सागरी मार्गाने होतो.

१४) ब्राझीलमध्ये एकूण पाच प्रमाणवेळा मानल्या जातात.

१५) ब्राझीलची अधिकृत प्रमाणवेळ ही ग्रीनिच वेळेच्या तीन तास मागे आहे.

१६) ब्राझीलमधील संदेशवहन गतिमान आहे.

१७) ८२° , ३२° पूर्व हे भारतीय प्रमाणवेळेचे रेखावृत्त आहे.

१८) भारतीय प्रमाणवेळेचे रेखावृत्त अलाहाबाद शहराजवळून जाते.

१९) भारतीय प्रमाणवेळ ही ग्रीनिच वेळेच्या ३ तास ३० मिनिटे पुढे आहे.

२०) ब्राझील देशाची वेळ भारतीय वेळेच्या पुढे आहे.

**प्रश्न- २ रा. कारणे द्या.**

१) ब्राझीलमध्ये पर्यावरणस्नेही पर्यटनाचा अधिक विकास केला जात आहे.
२) भारतात एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील पर्यटन क्षेत्राचा वाटा कमी आहे.
३) ब्राझीलमधील पश्चिम भागात रस्ते मार्गाचा विकास मर्यादित झाला आहे.
४) ब्राझीलमध्ये जलमार्गाचा विकास झालेला नाही.
५) उत्तर भारतीय मैदानी प्रदेशात लोहमार्गाचे जाळे विकसित झाले आहे.
६) देशाच्या सर्वांगीण विकासासाठी वाहतूक मार्गाचा विकास उपयुक्त ठरतो.
७) आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी सागरी मार्गावर अवलंबून राहावे लागते.
८) ब्राझीलच्या उत्तर आणि वायव्य भागात दूरसंचार सेवांचा विकास मर्यादित स्वरूपात झाला आहे.
९) दूरसंचार सेवेचा विस्तार करणे हे ब्राझीलच्या अर्थव्यवस्थेला एक आव्हान होते.
१०) भारत हा सर्वाधिक स्मार्टफोन आणि इंटरनेट वापरणाऱ्यांचा देश बनला आहे.
११) दूरसंचार उद्योग या क्षेत्रात भारताचा भविष्यकाळ उज्ज्वल झाला आहे.

**प्रश्न ३ रा. थोडक्यात उत्तरे द्या.**

१) ब्राझीलचा कोणता घटक पर्यटकांना आकर्षित करतो?
२) ब्राझीलच्या अंतर्गत भागात लोहमार्गाच्या विकासात कोणत्या अडचणी आहेत ?
३) ब्राझील मध्ये कोणत्या साधनांमुळे संदेशवहन अतिशय गतिमान झाले आहे?
४) परदेशी पर्यटक भारतात कोणत्या कारणासाठी येतात ?
५) भारतातील कोण-कोणत्या वैशिष्ट्यांमुळे परदेशी पर्यटक भारताला भेट देतात?